23 AUG 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे 'एनईपी'चे काम समाधानकारक

## 'उच्च शिक्षण'च्या प्रधान सचिवांनी घेतला आढावा; नावीन्यपूर्ण उपक्रमांवर कुलगुरूंसमवेत चर्चा


**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २२ : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) अंमलबजावणीचे काम समाधानकारक आहे. याबाबत आणखी आवश्यकता भासल्यास विद्यार्थी, शिक्षकांसाठी उपक्रम राबवावेत, अशी सूचना उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव डॉ. विकासचंद्र रस्तोगी यांनी आज मुंबई येथे केली. त्यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याशी सुमारे साडेतीन तास चर्चा केली. यावेळी विद्यापीठाच्या कामकाजाचा आढावा घेतला.

मंत्रालयातील या बैठकीस उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे उपसचिव प्रताप लुबाळ, डॉ. विजय जोशी, शक्ती सिंग, विद्यापीठाचे मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख, संगणक केंद्राचे अभिजित रेडेकर उपस्थित होते. प्रारंभी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाने केलेली 'एनईपी'ची अंमलबजावणी, विद्यार्थी- शिक्षक-कर्मचारी, आदी विद्यापीठाच्या विविध घटकांसाठी राबविलेले उपक्रम, शैक्षणिक आणि संशोधनाच्या अनुषंगाने राबविण्यात येत असलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली. संशोधन क्षेत्रातील कामगिरीची माहिती प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी दिली. त्यातील विशेषतः

> या बैठकीमध्ये विद्यापीठाच्या एनईपी अंमलबजावणीच्या कामावर प्रधान सचिव डॉ. विकासचंद्र रस्तोगी यांनी समाधान व्यक्त केले. भविष्यातील काही योजनांवर शासनस्तरावर विचार करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. त्यानुसार शासनास प्रस्ताव सादर करण्यात येतील.
> **-डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

एनईपीची अंमलबजावणी, नावीन्यपूर्ण उपक्रम, एनआयआरएफ रँकिंग, परदेशी विद्यार्थ्यांचे प्रवेश, विद्यापीठ कामकाजातील संगणकीकरण, नवे प्रस्ताव, आदींबाबत डॉ. रस्तोगी यांनी कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्याशी चर्चा केली. सागरी जैविक विविधतेबाबतच्या संशोधनाला शासनाकडून पाठबळ मिळावे, अशी मागणी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केली. त्यावर याबाबतचा प्रस्ताव सादर करा. त्याचा निश्चितपणे विचार केला जाईल. विद्यापीठात स्कूल सिस्टीम राबविण्यासाठी अधिक प्रयत्न करावेत. भारतीय ज्ञान व्यवस्थेअंतर्गत ऑनलाईन कोर्स उपलब्ध करून द्यावेत. जे कोर्स ऑनलाईन आहेत. त्यांचा समावेश अभ्यासक्रमांमध्ये संदर्भ म्हणून करण्यात यावा, असे प्रधान सचिव रस्तोगी यांनी सुचविले.



मुंबई : येथे गुरुवारी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव डॉ. विकासचंद्र रस्तोगी यांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याशी एनईपी अंमलबजावणीसह विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी शेजारी उपसचिव प्रताप लुबाळ, डॉ. विजय जोशी, शक्ती सिंग, अधिष्ठाता एम. एस. देशमुख उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 3 AUG 2024

तरुण भारत

# प्रधान सचिव डॉ. रस्तोगी यांनी घेतली विद्यापीठाची माहिती

कोल्हापूर: मुंबई येथील मंत्रालयात गुरुवारी झालेल्या बैठकीत उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव डॉ. विकासचंद्र रस्तोगी यांनी शिवाजी विद्यापीठाच्या कामकाजाचा आढावा घेतला. शैक्षणिक धोरण अंमलबजावणी करण्यासंदर्भा राबवलेल्या उपक्रमांची माहिती कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांनी दिली. या बैठकीस उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे उपसचिव प्रताप लुबाळ, डॉ. विजय जोशी, शक्ती सिंग, विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख, संगणक केंद्राचे अभिजित रेडेकर उपस्थित होते.



- **मुंबईतील मंत्रालयात झाली बैठक**
- **कुलगुरु डॉ. शिर्के, प्र-कुलगुरु यांनी दिली माहिती**

नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, विविध घटकांसाठी राबविलेले उपक्रम, संशोधन, विद्यापीठाचे नावीन्यपूर्ण उपक्रम, आदी विषयांवर डॉ. रस्तोगी यांनी चर्चा केली. त्यांनी शिवाजी विद्यापीठाने नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणीचे काम समाधानकारक असल्याचे सांगितले. स्कूल सिस्टीम राबविण्याची सूचनाही त्यांनी केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 AUG 2024

पुण्यनगरी

# मानवाच्या विकासासाठी संशोधन महत्त्वाचे

## शिवाजी विद्यापीठाचे आविष्कार समन्वयक डॉ. डी. एच. दगडे यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी संशोधन हे महत्त्वाचे आहे. संशोधन चांगल्या प्रतीचे व्हावे, यासाठी आविष्कारसारख्या स्पर्धा महत्त्वाच्या ठरतात. आविष्कार स्पर्धेबाबत शिवाजी विद्यापीठांतर्गत असणाऱ्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी, हा कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे आविष्कार समन्वयक डॉ. डी. एच. दगडे यांनी केले.



शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग आणि न्यू कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय आविष्कार संशोधन स्पर्धा माहिती कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील होते.

स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. डॉ. एस. डी. डेळेकर, डॉ. आर. एच. अतिग्रे, डॉ. एस. बी. महाडिक, डॉ. एम. एस. निंबाळकर, डॉ. पी. के. पवार, डॉ. पी. एम. माने, डॉ. टी. एम. चौगले, डॉ. एस. एम. भोसले, तसेच मागील वर्षीच्या आविष्कार संशोधन स्पर्धेतील विजेते सुरजित अडगळे, मुनीफ अन्सारी यांनी मार्गदर्शन केले. सुरेखा आडके, उपप्राचार्य डॉ. आर. डी. ढमकले, प्रबंधक एम. वाय. कांबळे आदी उपस्थित होते. पाहुण्यांचा परिचय सरोज देशमुख यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. मनीषा नायकवडी यांनी केले. आभार आविष्कार समन्वयक डॉ. ए. आर. कांबळे-जगतकर यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 AUG 20
तरुण भारत

# सौरऊर्जेपासून विद्युत ऊर्जा निर्मिती ; चौघांना जर्मन पेटंट

**प्रतिनिधी**
चंदगड

'धातू ऑक्साईड (ऊग्ध२) रिडयुसड ग्राफीन ऑक्साइड (ँउध) आधारीत नॅनो संमिश्र वापरून सौर ऊर्जेपासून विद्युत ऊर्जा निर्मितीचा अभ्यास' या विषयावर जर्मन पेटंट शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. सागर डेळेकर, यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील प्रा. विजय घोडके, शिवाजी विद्यापीठ स्कूल ऑफ ज्ञानो सायन्स विभागातील डॉ. प्रमोद कोयले, यशवंतराव पाटील विज्ञान महाविद्यालय सोळंकुर येथील प्रा. प्रकाश पवार यांना सौरऊर्जेपासून विद्युतऊर्जा निर्मितीसाठी जर्मन पेटंट मिळाले आहे.

नॅनो संमिश्रे आधारीत सौरऊर्जेपासून विद्युत ऊर्जा निर्मितीसाठी सखोल अभ्यास केला असून त्यासाठी त्यांना सदर संशोधन कार्यास जागतिक दर्जाचे पेटंट मिळाले आहे. या संशोधनाला विज्ञानामध्ये एक विशेष महत्व प्राप्त झाले आहे. ज्यामध्ये सूर्य प्रकाशासारख्या स्रोतापासून विद्युतऊर्जा निर्मितीसाठी त्याचा वापर होतो. आजच्या ग्लोबल वार्मिंगच्या समस्या व सिलिकॉन–आधारीत सौर उपकरणाच्या उच्च किंमतीच्या संदर्भात विविध शास्त्रज्ञ सध्या उपयुक्त पर्याय विकसित करण्यासाठी कार्यरत आहेत. सौर ऊर्जेचा वापर करण्याच्या विविध धोरणापैकी नॅनोसंमिश्र आधरित सौर यंत्रणा, ही एक उपयोगी व आकर्षक बाब आहे. यासाठी हे संशोधन उपयुक्त आहे. प्रा. डॉ. सागर डेळेकर


प्रा. डॉ. सागर डेळेकर


प्रा. विजय घोडके


डॉ. प्रमोद कोयले


प्रा. प्रकाश पवार

यांना ११ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पेटंट मिळाले आहेत. व त्यांचे १०० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित आहेत. प्रा.विजय घोडके यांना आंतरराष्ट्रीय पेटंट मिळाले असून त्यांनी १ राष्ट्रीय व १आंतराष्ट्रीय, अशी दोन पेटंटसाठी अर्ज केले आहेत. त्यांचे ९ शोधनिबंध प्रकाशित आहेत. डॉ. कोयले यांना २आंतरराष्ट्रीय व १ राष्ट्रीय पेटंट मिळाले असून त्यांचे १८ शोधनिबंध प्रकाशित आहेत. प्रा. प्रकाश पवार यांना १ आंतराष्ट्रीय पेटंट मिळाले आहे. व त्यांचे ८ शोधनिबंध प्रकाशित आहेत. दौलत विश्वस्त संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक गोपाळराव पाटील, अध्यक्ष अशोकराव जाधव, उपाध्यक्ष संजय पाटील, सचिव विशाल पाटील, प्राचार्य डॉ. बी. डी. अजळकर, प्रा. ए. एस. बागवान यांच्याकडून कौतुक होत आहे

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 3 AUG 2024
पुढारी

# विद्यार्थ्यांच्या स्टार्टअपसाठी शिवाजी विद्यापीठ कटिबद्ध : डॉ. डेळेकर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जगभरातील 'स्टार्टअप'च्या यादीत अमेरिका, चीननंतर भारत तिसऱ्या स्थानी आहे. प्रथमस्थान प्राप्तीसाठी केंद्र व राज्य सरकार प्रयत्नशील आहे. त्यांनी सुरू केलेल्या 'स्टार्टअप' योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कल्पनांना आकार देत नवउद्योगांच्या स्थापनेसाठी शिवाजी विद्यापीठ कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य (आयआयएल) केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी केले.

हिंदी विभाग व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशनतर्फे (एसयूके आरडीएफ) गुरुवारी आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. हिंदी विभागाच्या प्रभारी प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, एसयूके आरडीएफचे संचालक डॉ. पी. डी. राऊत उपस्थित होते. प्रास्ताविकात डॉ. राऊत यांनी एसयूके आरडीएफ व शासनाच्या विविध योजनांविषयी माहिती दिली. डॉ. प्रकाश मुंज यांनी आभार मानले. डॉ. सुषमा चौगुले, प्रा. अनिल मकर, श्रुतिका सरगर यांनी मनोगत व्यक्त केले. इन्क्यूबेटरचे मॅनेजर शिवानंद पाटणे यांनी विद्यापीठात सुरू असलेल्या नवोपक्रमांची माहिती दिली. यावेळी डॉ. संतोष कोळेकर, डॉ. अक्षय भोसले, डॉ. गीता दोडमणी, प्रा. प्रकाश निकम, डॉ. जयसिंग कांबळे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 3 AUG 2024

पुढारी

# संगीत, नाट्यशास्त्र अधिविभागात नृत्य कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने नुकतेच कॉण्टेंपोररी नृत्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेसाठी 'शोवन दास' (बांगला देश) यांचे मार्गदर्शन लाभले.

तीन दिवस चाललेल्या कार्यशाळेत वेगवेगळ्या पद्धतीचे फिजिकल व मेंटल फिटनेसच्या दृष्टिकोनातून विविध गेम्स, प्रॅक्टिस पद्धतींद्वारे बॉडी अवेअरनेस, फिजिकल अँड मेंटल बॉडी, कॉण्टेंपोररी डान्स फ्रेजेस, ब्लॉकिंग, बेसिक ब्यालेट डान्स प्रॅक्टिस, क्रिएटिंग मुव्हमेंट, फ्लोअर वर्क, मेडिटेशन इन डान्स इत्यादी विषयांची विद्यार्थ्यांना ओळख झाली. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्र. विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचे स्वागत ज्येष्ठरंगकर्मी डॉ. संजय तोडकर यांनी केले. या यावेळी डॉ. सचिन कचोटे, प्रशांत देसाई यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 AUG 2024
तरुण भारत

# डीवायपी स्कूल ऑफ आर्किटेक्चरच्या सौरवी कुरणेला शिवाजी विद्यापीठाचे गोल्ड मेडल







कोल्हापूर : कसबा बावडा येथील डी. वाय. पाटील स्कूल ऑफ आर्किटेक्चरच्या सौरवी रमेश कुरणे हिने शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादी प्रथम क्रमांक मिळवत गोल्ड मेडल मिळवले आहे. महाविद्यालयाच्या सहा विद्यार्थ्यांनी या दहा गुणवत्ता यादीत टॉप १० मध्ये येण्याचा बहुमान मिळवला आहे.

ऐश्वर्या एकनाथ धवन (चौथा), आर्यश शिवाजी संकपाळ (आठवा), रुची समीर जोशी व नक्षत्रा मिलिंद परुळेकर (नववा) व अपूर्वा राजेंद्र शिंगारे (दहावा) यांनी 'टॉप १०' मध्ये स्थान मिळवले आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही डी. वाय. पाटील स्कूल ऑफ आर्किटेक्चरच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत आपले वर्चस्व मिळवत आपली गौरवशाली यशाची परंपरा कायम राखली आहे.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, डॉ. अनिलकुमार गुप्ता, प्राचार्य डॉ. संतोषकुमार चेडे, डॉ. लितेश मालदे, आर्किटेक्चर विभाग प्रमुख प्रा. इंद्रजीत जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 AUG 2024


पुण्यनगरी

# सौरवी कुरणेला विद्यापीठाचे गोल्ड मेडल

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कसबा बावडा येथील डी. वाय. पाटील स्कूल ऑफ आर्किटेक्टची विद्यार्थिनी सौरवी कुरणे हिने शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक मिळवत गोल्ड मेडल मिळवले आहे. याशिवाय महाविद्यालयाच्या सहा विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत टॉप १० मध्ये येण्याचा बहुमान मिळवला आहे.

आर्किटेक्चर पदवी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या गुणवत्ता यादीत सौरवी कुरणे हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर ऐश्वर्या धवन (चौथा), आर्यश



सौरवी कुरणे | आर्यश संकपाळ | रुची जोशी | नक्षत्रा परुळेकर | अपूर्वा शिंगारे

संकपाळ (आठवा), रुची जोशी व नक्षत्रा परुळेकर (नववा), अपूर्वा शिंगारे (दहावा) यांनी 'टॉप १०'मध्ये स्थान मिळवले आहे. डी. वाय. पाटील स्कूल ऑफ आर्किटेक्चर हे पश्चिम महाराष्ट्रातील एकमेव स्वायत्त आर्किटेक्चर महाविद्यालय असून, ४० वर्षांपासून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ओळखले जाते. यंदाही विद्यार्थ्यांनी गौरवशाली यशाची परंपरा कायम राखली.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता, प्राचार्य डॉ. संतोषकुमार चेडे, रजिस्ट्रार डॉ. लितेश मालदे, विभागप्रमुख प्रा. इंद्रजित जाधव यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

23 AUG 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



भवताल

डॉ. रसिया पडळकर

**पर्यावरणाचा विनाश हा सोबतीने मानवाचा विनाश घेऊन येतो, पण पर्यावरणाचा शाश्वत विकास हा सर्वांच्या मूलभूत गरजांचे नक्कीच भरण-पोषण करणारा असतो.**

# नव्या शतकाचा हरित जाहीरनामा

पहिली वसुंधरा परिषद १९७२ साली झाल्यानंतर पर्यावरण रक्षणाची वाट पुढे थोडी विस्तारत गेली. संयुक्त राष्ट्र संघाच्या पुढाकाराने पर्यावरण विषयक विविध विषयांवर बैठका घेणे, देशांच्या समूहांमध्ये त्याच्या पर्यावरण प्रश्नासंदर्भात काही करार करणे, अशी काही पाऊले टाकली जाऊ लागली. पाणथळ जागा आणि सरोवरांच्या संवर्धनासाठी १९७१ साली झालेले रामसार कन्व्हेन्शन, वन्यजीवांच्या अवयवांच्या व्यापारावर बंदी आणणारे १९७३ चे साइटीज कन्व्हेन्शन, १९८९ साली जर्मनी येथे झालेले स्थलांतरित पक्षांविषयक बॉन कन्व्हेन्शन, एका देशातील कचरा दुसऱ्या देशाच्या किनाऱ्यांवर टाकण्यावर निर्बंध लादणारे १९८९ चे बेसल बॅन कन्व्हेन्शन असे अनेक करार ७० ते ९० च्या दशकात करण्यात आले. अनेक देशांनी त्यात सहभाग नोंदवला. त्यानुसार आपापल्या देशात पूरक कायदेदेखील करण्यात आले. मानवी विकासाच्या आणि जागतिक आर्थिक आदान-प्रदानाच्या नव्या शक्यता घेऊन १९९० चे दशक उजाडले. आर्थिकदृष्ट्या समान नसणाऱ्या देशामधील आंतरराष्ट्रीय व्यापार खुला झाला, तंत्रज्ञानाच्या भरारीने उत्पादनांचे नवे विक्रम प्रस्थापित होऊ लागले आणि या सगळ्या विकासाच्या एक्स्प्रेसमध्ये पर्यावरणासोबत मानवी जीवनाचा चेहरादेखील भेसूर होऊ लागला. देशादेशांतील, देशांतर्गत प्रांताप्रांतातील आणि वर्गावर्गातील दरी वाढू लागली. एकेकाळी विपुल नैसर्गिक साधन संपत्ती असणारे भूभाग सधन, समृद्ध आयुष्य जगत असत, पण



नव्या जगात नैसर्गिक साधन संपत्तीच्या मालकीचे हस्तांतरण होऊ लागले आणि नैसर्गिक साधन संपत्तीने समृद्ध भागांची लूट होऊ लागली. हे भाग अधिकाधिक ओरबाडले जाऊ लागले, स्थानिकांना तेथून हद्दपार व्हावे लागले. जैवविविधतेचा ऱ्हास होऊ लागला.

पर्यावरणाचा विनाश हा सोबतीने मानवाचा विनाश घेऊन येतो, पण पर्यावरणाचा शाश्वत विकास हा सर्वांच्या मूलभूत गरजांचे नक्कीच भरण- पोषण करणारा असतो. आर्थिक विकासाच्या या तथाकथित प्रारूपाची चर्चा होणे क्रमप्राप्तच होते. विकासाच्या महामार्गात पर्यावरण हा एक अडथळा न बनता, त्याला सामावून घेऊन विकास शक्य आहे का? असे अनेक प्रश्न समोर उभे ठाकलेले होते. संयुक्त राष्ट्र संघटनेमार्फतच स्थापन केलेल्या ब्रूटलँड कमिशनने प्रकाशित केलेल्या 'आवर कॉमन फ्युचर' अर्थात 'आपले सामूहिक भवितव्य' या अहवालातून वरील अनेक शक्यतांवर विस्तृत भाष्य केले होते. आणि या अहवालामध्येच त्यांनी 'शाश्वत विकास' ही संकल्पना अधोरेखित केलेली होती. विकासाचे एक असे प्रारूप जे, भविष्यातील पिढ्यांच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता, वर्तमानातील पिढीच्या गरजा पूर्ण करेल.

खरेतर आपल्याकडे गांधींनी असेच काहीसे फार आधीच सांगितले होते, ते म्हणतात, "पृथ्वीवर प्रत्येकाच्या गरजेला पुरेल असे सर्व काही आहे, पण आपण जर हव्यासाची शिकार झालेले असू, तर एकाची सुद्धा हव्यास पुरी होऊ शकेल इतकेदेखील आपल्याकडे नाही.." या पार्श्वभूमीवर १९९२ साली संयुक्त राष्ट्र संघाने ब्राझील येथील रिओ दी जानेरो येथे दुसरी वसुंधरा परिषद आयोजित केली. या परिषदेचा विषय होता, 'पर्यावरण आणि शाश्वत विकास'.

या परिषदेत एक महत्त्वाचा ठराव म्हणजे अजेंडा २१. ही अशी निर्देशक तत्त्वे आहेत, ज्यामध्ये २१व्या शतकातील विकासाचा कार्यक्रम आखताना देशांनी वापर करावा, अशा शाश्वत विकासाच्या मूल्यांचा समावेश केलेला आहे. यामध्ये सामाजिक आणि आर्थिक विकासाची दिशा, विकासाच्या प्रक्रियेत नैसर्गिक साधन संपत्तीचं संवर्धन आणि व्यवस्थापन, विकासातील महत्त्वाच्या भागीदारांची भूमिका आणि हे सर्व साध्य करण्यासाठी तंत्रज्ञान, शिक्षण, आंतरराष्ट्रीय सहकार्य अशा मुद्द्यावर विस्तृत चर्चा केलेली आहे. खरेतर यातील तत्त्वाची चर्चा देशातील निवडणुकांमध्ये झाली पाहिजे, संसदेतील चर्चेत पर्यावरण हा एक महत्त्वाचा विषय असला पाहिजे, कारण आपल्या सगळ्यांचे सामूहिक भवितव्य धर्म आणि जातीच्या अस्तित्वावर अवलंबून नसून केवळ आणि केवळ निसर्गाच्या संतुलित भविष्यावर अवलंबून आहे..